# म्हातारी न इतुकी अवघे पाऊणशे वयोमान

आज पंच्याहत्तरावा वाढदिवस! कसे गेले हे दिवस, कशी गेली एव्हढी वर्षे काहीच नाही उमगत.

लहानपण गेले लाडाकोडात असे सर्व म्हणणार, पण सातातली मधली तिचे असे कसे असणार?

वासरात लंगडी गाय असे हुशारीचे कौतुक ? त्रुटीच्या पाढ्यात संपे दिवसाची रंगत.

सहज मिळालेल्या यशाला मेहनतीची धार नसते अन त्याची किंमत जाणायची तेव्हा वयाची धारणा नसते.

महत्व यशाचे ज्यावर पुढचे कर्तृत्व उभारायचे, त्याची  उमजच नव्हती पण समजही नाही कोणी दिली.

दोष नाही कुणाचाच पण देवाच्या देणगीचे मोलच नुमजले साधारण यशाने पुढचे कर्तृत्वाचे मार्गच रोखले.

आळशावर आली गंगा त्याची किंमत नसे त्याला, यत्न तो देव मानावा, आधि केलेचि पाहिजे

ही सगळी वचने बासनातच राहिली. यशाची कमान मात्र अनवधानाने खाली उतरली.

स्वताच्या गुणावर आर्थिक स्वतंत्रता मिळाली पण भावनेच्या भरात ती  ही झोकून दिली.

लग्न संसार मुले यातच आयुष्य गुंफले वाचनाची गोडी अतूट त्यात मन विरंगुळले.

घरासाठी मुलांसाठी सर्वस्व ओतले पतिराजाच्या खुषीत स्वताचे अस्तित्व शोधले.

मुलानी यश दिले, यशाचे किल्ले बांधले अन आपापल्या ध्येयाकडे कूच करते झाले.

त्यांचे संसार. त्यांची खुषी. त्यांचे कर्तृत्व फुलारले, घर झाले रिकामे पण पतीच्या साथीने तगवले.

मनी विचार आला मी आळसापोटी काय गमावले ?  मुलानी अभिमानाने सांगावे असे मी काय केले ?

मन खंतावले, रुखरुख टोचू लागली, त्यातच अकल्पितपणे एक अघटित घडले.

कोणालातरी गणितात अडचण आली, विचारती झाली करता का मदत? अनवधानाने हो म्हटले.

अहो काय आश्चर्य देऊ करत तिला मदतीचा हात, शाळा कॉलेजातले गणित रुंजी घालु लागले मनात.

माझा मेंदू, माझी बुध्दी ताजीतवानी झाली, होते मी जरी सुस्तावलेली पण मेंदूची धार तीक्ष्णच राहिली.

खूप आनंद झाला, गणित शिकवण्यात पुरती रमले, आता तीस वर्षानंतर मी कॉलेजचे गणित जगू लागले.

मुलांना, पतीला, मैत्रिणीनाही माझे खूप कौतुक वाटले, त्यांच्या मोकळ्या मनाच्या पावतीने माझे मन भरले.

मुलांचे संसार परदेशात फुलू लागले, आई पपाना हक्काने बोलावणे आले.

परदेश फिरुन पहाताना नविन गोष्टी मनात साठल्या, नाना परी नाना वेष.

नाना प्रकारच्या माणसांच्या वागण्यातून लक्षात आले स्वभाव विशेष.

घरी परत आल्यावरही तिथल्या आठवणी जाईनात, मनात अस्वस्थता गोंधळ, कारण काही गमेना.

एक दिवस मला उमगले काळजात काहीतरी डाचत आहे, मनात ठुसठुसते डचमळते फसफसते आहे.

ठरवले लेखणीच्या आधारे ते ओकलेच पाहिजे, मनाची उलघाल मोकळी केलीच पाहिजे.

हळूहळू कागदावर कथा कविता उतरल्या, कुठेतरी मनाला शांती स्वस्थता जाणवल्या.

कथा कविता मसिकातून प्रदर्शित झाल्या, मन शांतावले, सुखावले कारण जाणत्यांनी प्रशंसिल्या.

मैत्रिणींचा आग्रह लिखाण आहे फार, छान पुस्तक काढून प्रसिध्द करून लोकांपर्यंत दे पोचवून.

तिच्याच मदतीने प्रकाशनाचा भार पेलला, मित्रमैत्रिणींच्या सहाय्यानेच वितरणाचा प्रवास झाला.

पुस्तक छापून गठ्ठे घरात आले ना तेव्हा प्रसवाच्या वेणांचा अनोखा अनुभव आला.

शरीर मन भरुन आले, मी तृप्त झाले माझ्या आपल्यांना अभिमानास्पद वाटेलसे काहीतरी घडले.

लिखाणाचा प्रवास आता चालूच आहे, नवीन प्रवास वर्णनाचे अध्याय त्यात जोडले जात आहेत.

या कथा कविता लिखाणाच्या सोहळ्यात मनाची उभारी स्वत्वाची जाणिव वाढली आहे.

वाचन ग्रुपच्या भेटीने नवीन साहित्य पुढ्यात येते त्यावर विचार, लेखन, चर्चा, विवेचन सगळे सुखविते.

मुलांमुळे प्रवासाची नवीन दालने उघडताहेत. मुलांच्या कर्तृत्वाने, सख्याच्या सोबतीने मी सुखावले आहे.

अशा सुखाच्या वेळी हे अनादिअनंता तुझ्याकडे मनापासून मागते एकच मागणे

शरीर निरोगी असावे, मन शांत असावे, सहज नकळत तुझ्याकडे प्रस्थान ठेवावे.

**नलिनी करंडे**

१३ फेब्रुवारी२०१५